# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक- २३६

**(सभावृत्तांत)**

**दिनांक- १८/०८/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **१८/०८/२०२१** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती, स्थायी समिती यांचे दालनातून मा.सभापती, स्थायी समिती हे मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

**१. मा.अॅड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे– सभापती**
२. मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा. बुर्डे सुवर्णा विकास
४. मा. फुगे भिमाबाई पोपट
५. मा. पोर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे
६. मा. भोईर सुरेश शिवाजी
७. मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८. मा. यादव मीनल विशाल
९. मा. पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील- आयुक्त, मा.विकास ढाकणे- अति.आयुक्त(१), मा.उल्हास जगताप- नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.राजन पाटिल- शहर अभियंता, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.नाळे- उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.लोणकर- उप आयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे, मा.इंगळे, मा.कुलकर्णी- सह शहर अभियंता, मा.लडकत- प्र.सह शहर अभियंता, मा.देशमुख, मा.बोदडे, मा.गायकवाड, मा.आगळे, मा.आढारी, मा.बहुरे, मा.थोरात- सहाय्यक आयुक्त, मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.साळवे- अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा. डॉ. वाबळे- अधिष्ठता वाय.सी.एम.एच., मा.देशमुख, मा.पाटील, मा.गट्टुवार, मा.पवार, मा.काळे- कार्यकारी अभियंता, मा.देशमुख, मा.पानसरे- प्रशासन अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले.**

विषय क्र. ३१) स्थापत्य ई क्षेत्रिय कार्यालयातील सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील कामामध्ये वाढ/ घट करणेबाबत- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३२) प्रभाग क्र.११ मधील कामाचे तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३३) ठराव क्र.८९६६ दि.१०/०३/२०२१ ला दुरुस्ती- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३४) महापालिका अतिक्रमण विभागामध्ये मानधन तत्वावर महिला सुरक्षा रक्षक कर्मचारी नेमणुकीबाबत- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३५) महापालिका अस्थापनेवर एक्सरे- टेक्निशिअन पदावर नेमणुक करणेबाबत- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३६) सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांनी Covid Care Centre मधील रूग्णांना पुरवठा केलेल्या दुधाची बिले अदा करणेबाबत- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३७) सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांचा समावेश करणेबाबत- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३८) अंतर्गत तरतुद वर्ग करणेबाबत.

-------------

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२३५ दि.११/०८/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक- १०१४१ विषय क्रमांक- ०१

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार,

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/८६६/२०२१, दि.२३/०७/२०२१.

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारतीय साथरोग नियंत्रण अनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) (क) यास अधिन राहून कोरोना विषाणुचा(Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी Antigen Test kits खरेदी करणेकामी प्रसिध्द केलेल्या ई-निविदेच्या अनुषंगाने M/s.Cupid Limited यांचेकडून STRUmed Solutions Pvt. Ltd., Chennai कंपनीचे iNSTAXPLOR™ Covid-19 Ag - Rapid Antigen Test Kit (Lot no STRUCOVAG022, MFG:2021/06, Exp:2023/05) ४,००० किटस् ( १,००,००० टेस्ट 25

Test per Kit Rate per Test Rs.३९.९५ अधिक ५% GST र.रु. १.९९ प्रमाणे प्रति टेस्ट र.रु. ४१.९५ या दराने खरेदी करण्यास व (निविदा र.रु. १,१६,००,०००/- पेक्षा ६५.५६% कमी दराने) येणा-या र.रु.३९,९५,०००/- अधिक ५% GST चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१४२ विषय क्रमांक- ०२

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग स्थापत्य ह मुख्यालय

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/८३३/२०२१,दि.२८/०७/२०२१.

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.40/102/2020-21 अन्वये प्रभाग क्र.३२ मधील विविध ठिकाणी स्थापत्य विषयक व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.मंगल इंडस्ट्रीज नि.र.रू.29,99,958/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणतीस लाख नव्व्यान्नव हजार नऊशे अठ्ठावण्ण फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,27,658/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,27,658/- पेक्षा 32.70% कमी म्हणजेच र.रु.19,70,314/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.6,501/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.72,300/- = एकुण र.रु.20,49,115/- (वीस लाख एकोणपन्नास हजार एकशे पंधरा) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१४३ विषय क्रमांक- ०३

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- स्थापत्य क मुख्यालय

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा. आयुक्तसो यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/८१९/२०२१, दि.२३/०७/२०२१.

मा. आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.8/1/2021-22 अन्वये पिंपरी येथील कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम समोरील इमारतीमध्ये मे.कोर्टासाठी फर्निचर व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.दि रायकॉन कन्स्ट्रक्शन्स नि.र.रू.6,10,09,021/- (अक्षरी र.रु.सहा कोटी दहा लाख नऊ हजार एकवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.6,09,63,371/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.6,09,63,371/- पेक्षा 20.82% कमी म्हणजेच र.रु.4,82,70,797/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.19,662/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.45,650/- = एकुण र.रु.4,83,36,109/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार

भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१४४ विषय क्रमांक- ०४

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/८८२/२०२१, दि.३०/०७/२०२१.

विषय- मे.ब्रिस्क इंडीया प्रा. लि.यांना २ महिन्याचा कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्रमांक- ०४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१४५ विषय क्रमांक- ०५

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- स्थापत्य ह मुख्यालय

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/८१७/२०२१, दि.१९/०७/२०२१.

विषय- प्रभाग क्र.३० दापोडी येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते बोपोडीपुल रस्ता अद्ययावत पद्धतीने विकसित करणेबाबत.

विषय क्रमांक- ०५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१४६ विषय क्रमांक- ०६

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार

सुचक- मा. कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा. बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/१२८९/२०२१, दि.०६/०८/२०२१.

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणु संसर्गाचा धोका निर्माण झाला आहे, कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या Covid-19 या संसर्गजन्य आजारामुळे पिंपरी चिंचवड शहरात आरोग्य विषयक आपत्कालिन परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोरोना विषाणूंच्या संसर्गाला प्रतिबंध घालण्यासाठी महापालिकेकडून आवश्यक ती दक्षता घेणेत येत असून त्या अनुषंगाने

विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मनपा रुग्णालये,जंम्बो कोविड सेंटर, ऑटो क्लस्टर कोविड हॉस्पिटल या ठिकाणी कोरोना विषाणुमुळे संसर्ग झालेल्या बाधित रुग्णांची संख्या वाढत असुन त्याकरीता Injection Remdesivir 100mg ची मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे तथापी आवश्यक त्या प्रमाणात पुरवठा होत नसल्याने बाजारात उपलब्ध असलेल्या ठिकाणाहुन औषधे खरेदी करणे आवश्यक होते या दरम्यान मा.जिल्हाधिकारी , पुणे यांनी सदर इंजेक्शनचे पुरवठ्या करीता वेळोवेळी आदेश पारीत करुन Vials च्या संख्येसह पुरवठाधारकांना निश्चित करुन दिले होते. त्याप्रमाणे मनपाचे कोवीड हॉस्पीटल करीता **सोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते ३** पुरवठाधारकाकडुन तातडीने **एकुण 138 Vials** थेट पध्दतीने एकुण र.रु.**3,15,970/-** ची खरेदी करण्यात आलेली आहे. सदरचे खर्चास भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ ,सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दिनांक १३/०३/२०२० व १४/०३/२०२० व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल कलम ४१ व ५०, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (६) व कलम ६७ (३) (क) तसेच महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५(२)(२) नुसार **सोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र. १ ते ३** पुरवठादारकाकडुन थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदीकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१४७ विषय क्रमांक- ०७

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार

सुचक- मा. कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा. बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/१२८८/२०२१, दि.०६/०८/२०२१.

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये म्युकर मायकोसिस रुग्णसंख्या वाढत असल्यामुळे मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात म्युकर मायकोसिस संसर्ग झालेल्या बाधित रुग्णांवर वैद्यकिय उपचार केले जातात. त्याकरीता Inj.Amphotericin B ची तातडीने आवश्यकता असलेने वैद्यकिय विभागाचे मध्यवर्ती औषध भांडार विभागाची मागणी प्राप्त झाली आहे. सदर औषधाचा बाजारात तुटवडा असलेने तसेच सदर औषधे औषधाचे निविदेत समाविष्ट नसलेने उपलब्ध होणेस अडचण निर्माण झाली आहे. सद्यस्थितीत मा.जिल्हाधिकारी , पुणे यांनी सदरइंजेक्शनचे पुरवठ्या करीता वेळोवेळी आदेश पारीत करुन Vials च्या संख्येसह पुरवठाधारकांना निश्चित करुन दिले होते. त्याप्रमाणे मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालया करीता **मे.श्लोका एंटरप्राईजेस , पुणे** यांचेकडुन **Inj. Amphotericin B 50mg (Liposonal)** र.रु.6286.50 प्रति Vial (सर्व करासहीत) या दराने 70 Vials करीता **एकुण र.रु.4,40,055/-**ची खरेदी करण्यात आलेली आहे. सदरचे खर्चास भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ ,सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दिनांक १३/०३/२०२० व १४/०३/२०२० व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल

कलम ४१ व ५०, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (६) व कलम ६७ (३) (क) तसेच महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५(२)(२) नुसार **मे. श्लोका एंटरप्राईजेस, पुणे** यांचेकडुन थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदीकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मान्यता येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१४८ विषय क्रमांक- ०८

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- पाणी पुरवठा

सुचक- मा. कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा. बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.जशुकें/पापु/१६५/२०२१, दि.०४/०८/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

महापालिकेच्या कोविड सेन्टर मध्ये रुग्णाचे मनोबल वाढविणेसाठी श्री. शिवप्रसाद महाले (लाईफ मॅनेजमेंट कोच, नाशिक) यांचे उपक्रमाअंतर्गत अँटोक्सल्टर व जम्बो कोविड सेन्टर येथे १४ मे २०२१ पासुन रिचार्ज टु डिस्चार्ज हा उपक्रम राबविणेत आला आहे. श्री. महाले यांनी संगीत माध्यम, मनन (Meditation) तसेच प्रोत्साहन च्या माध्यमातून रुग्णांना मानसिक आधार देऊन आजारपणातून बाहेर काढणेसाठी चांगले कार्य केले आहे. या कार्याची वृत्तपत्रांनी आणि प्रसार माध्यमांनीही दखल घेतली आहे. समाजातील सर्व स्तरामधून सदर उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. दि.०४/०८/२०२१ रोजीच्या मान्य टिपणीनुसार श्री. शिवप्रसाद महाले यांना प्रतिदिवशी र.रु १२००/- (अक्षरी र.रु.बाराशे फक्त) एवढा भत्ता मान्य करणेत आलेला आहे. श्री. शिवप्रसाद महाले यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत १४ मे २०२१ ते १३ सप्टेंबर २०२१ पर्यंत कार्यरत राहणार आहे. तरी त्यासाठी प्रतिदिवशी र.रु.१२००/- यानुसार ४ महिन्यांचे र.रु.१,४४,०००/- (अक्षरी एक लाख चव्वेचाळीस हजार फक्त) मानधन होत आहे. सदर खर्चास मा. स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे. तरी त्याअनुषंगाने महापालिकेच्या कोविड सेन्टर मध्ये रुग्णांचे मनोबल वाढविणेसाठी श्री. शिवप्रसाद महाले यांच्या उपक्रमाबाबत देणेत येणा-या र.रु.१,४४,०००/- चे मानधनासाठी होणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१४९ विषय क्रमांक- ०९

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक- मा. कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा. बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.पअक/३/कावि/७/२०२१, दि.०६/०८/२०२१.

मा. आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड शहरातून वाहणा-या पुनर्रुत्जीवन प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी विशेष उद्देश वहन (Special Purpose Vehicle [SPV]) स्थापन करणे बाबत. पिंपरी चिंचवड शहराच्या हद्दीतून

पवना, मुळा व इंद्रायणी या तीन नद्या वाहतात. यामधील मुळा नदीकाठ विकसन प्रकल्प, पुणे मनपाच्या सहकार्यानेएकत्रितपणे राबविणेत येत असून, शहरातून वाहणा-या पुणे मनपाने या कामासाठी स्थापन केलेल्या कंपनीस मुळा नदीच्या पिंपरी चिंचवड शहरातील लांबीच्या प्रमाणात आवश्यक तो खर्च दिला जाणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहराच्या मध्यवर्ती भागातून पवना नदी वाहत असून, शहराच्या उत्तरेकडील हद्दीवरुन इंद्रायणी नदी वाहत आहे. इंद्रायणी नदीची एक बाजू पिंपरी चिंचवड हद्दीत असून दुसरी बाजू पुणे ग्रामीणमध्ये म्हणजेच PMRDA यांच्या अखत्यारित येत असल्याने नदीच्या प्रदूषणासाठी त्यानुसार पिंपरी चिंचवड हद्दीतून वाहणा-या पवना व इंद्रायणी नदी पुनर्रुत्जीवन प्रकल्प राबवणेसाठी अशा कामांचा अनुभव असणा-या Ms. HCP Desing & Planning & Management Pvt. Ltd. यांची प्रकल्प सल्लागार म्हणून जून २०१८ मध्ये नेमणुक करणेत आली असून सद्यस्थितीत या प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल [DPR] बनविण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. पवना व इंद्रायणी नदीसाठी पुनर्रुत्जीवन प्रकल्प राबविणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी मा.स्थायी समितीने ठराव क्रमांक २५९०, दिनांक २५/०४/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक १७७, दिनांक २०/०४/२०१८ अन्वये दोन्ही नद्यांसाठी नदी सुधार प्रकल्प राबविणेस एकत्रित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने प्रकल्प सल्लागारांमार्फत तयार होणा-या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार [DPR] प्रकल्पाची अंमलबजावणी प्राधान्याने करणेसाठी स्वतंत्र कंपनी Special Purpose Vehicle [SPV] स्थापित करणेआवश्यक आहे. पवना व इंद्रायणी नदी पुनर्रुत्जीवन प्रकल्पाची व्याप्ती पाहता सदर दोन्ही नदीशी सबंधित शासनाच्या विविध संस्था आहेत, यामध्ये नदीची जागा ही महसुल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेशी सबंधित असून तसेच पाणी विषयक संशोधन करणारी केंद्र शासनाची CWPRS संस्था खडकवासला, पुणे येथे आहे, पाऊस व पुरस्थितीचे अनुषंगाने नदीच्या वहना बाबतचे तांत्रिक अधिकार महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग यांचे कार्यक्षेत्रात येतात. तसेच शहरातील इंद्रायणी नदीचा दुसरा काठ पुणे ग्रामीण म्हणजे PMRDA यांच्या कार्यक्षेत्रात येत असून पवना नदीचा काही भाग PCNTDA व Defense यांच्या कार्यक्षेत्रात येतो. त्या अनुषंगाने पवना व इंद्रायणी नदी पुनर्रुत्जीवन प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी स्थापन करावयाच्या Special Purpose Vehicle [SPV] मध्ये खालील सदस्यांचा आंतर्भाव करणे आवश्यक आहे.

1. मा. महापौर, पिं.चिं.मनपा.
2. मा. अध्यक्ष, स्थायी समिती, पिं.चिं.मनपा.
3. मा. सभागृह नेते, पिं.चिं.मनपा.
4. मा. आयुक्त, पिं.चिं.मनपा. (मुख्य कार्यकारी अधिकारी)
5. मा. विरोधी पक्षनेते, पिं.चिं.मनपा.
6. मा. जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा
7. मा. मुख्याधिकारी, PMRDA
8. मा. शहर अभियंता, पिं.चिं.मनपा.
9. मा.मुख्य अभियंता, पुणे जलसंपदा विभाग
10. मा. सहशहर अभियंता, पर्यावरण, पिं.चिं.मनपा

11. मा. उपसंचालक, नगररचना विभाग, पिं.चिं.मनपा.

12. मा.मुख्य अभियंता, पुणे जलसंपदा विभाग

13. मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पिं.चिं.मनपा.

सदरच्या प्रस्तावित विशेष उद्देश वहन (Special Purpose Vehicle [SPV]) ला महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक असून सदरच्या SPVमार्फत खालिल कामकाज मुख्यत्वेकरुन करणेस मान्यता देणे गरजेचे आहे.

1. यापूर्वी मा.महापालिका सभेने मंजूरी दिलेनुसार शहरातून वाहणा-या नदीपात्राची जागा महाराष्ट्र शासनाच्या महसुल विभागाकडून मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत देखभाल, दुरुस्तीकामी SPV कडे हस्तांतरीत करुन घेणे.
2. नदी पुनर्रुत्जीवन प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांचेकडील विविध योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य अनुदान, किंवा आवश्यकता भासल्यास Municipal Bond किंवा कर्ज उभे करणे.
3. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनूसार नदी परिसरात Town Planning Scheme [TP] राबविणे यासाठी आवश्यक सर्व निर्णय घेणे व यातून निधी व लॅन्ड बॅंक तयार करण्याचे अधिकार या कंपनीस असतील.
4. प्रकल्पाचे अंमलबजावणीसाठी CSR किंवा CER चे अनुदानामधून किंवा पूर्ण प्रकल्प किंवा प्रकल्पाचा काही भाग PPP तत्वावर राबविणेचा अधिकार कंपनीस असेल.
5. प्रकल्पाचे काम पूर्ण झालेनंतर त्याचे चालन, देखभाल, दूरुस्तीचे काम करणेचे अधिकार SPV कंपनीस देणे.

सबब उपरोक्तप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील पवना व इंद्रायणी नदी पुर्नरुत्जीवन प्रकल्पाचे अंमलबजावणीसाठी वर नमुद केलेल्या सदस्यांचा समावेश करुन विशेष उद्देश वहन (Special Purpose Vehicle [SPV]) गठीत करणेस तसेच सदरच्या SPV कंपनीस वर नमूद केलेप्रमाणे कामकाज सोपविणेस मान्यता देणे कामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सदरचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची प्रकरण २ नियम One (K) अंतर्गत तातडीचा विषय म्हणून माहे ऑगस्ट २०२१ च्या मा. महापालिका सभेमध्ये दाखल करुन घेणेत यावा. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१५० विषय क्रमांक- १०

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार विभाग

सुचक- मा. कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा. बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/४५२/२०२१, दि.०९/०८/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

मा.आमदार श्री.जगताप लक्ष्मण पांडुरंग, विधानसभा सदस्य चिंचवड विधानसभा, पुणे यांनी मागणी केलेलेनुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२१-२२ अंतर्गत त्यांचे आमदार निधीतुन मनपाच्या रुग्णालयात अनुक्रमे १)वाय सी.एम रूग्णालय २)इंदिरा गांधी रूग्णालय सांगवी

३)थेरगाव रूग्णालय ४)पिंपळे गुरव रूग्णालय, पिंपळे गुरव येथे मे. हिन्दुस्तान एंटिबायोटिक्स लि. पिंपरी ४११०१८ (भारत सरकारचा उपक्रम) यांचेकडून थेट पध्दतीने हेल्थ ATM मशीन प्रति नग र.रू ३,३६,०००/- (सर्व करांसह) याप्रमाणे एकुण ०४ मशीन खरेदी करणेकामी थेट पध्दतीने येणारा र.रू.१३,४४,०००/- (अक्षरी रूपये तेरा लाख चव्वेचाळीस हजार फक्त) चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) (क) व अनुसुची ड प्रकरण क्रमांक.५(२)(२) नुसार मा.स्थायी समितीची मान्यता घेणे व मे.हिन्दुस्तान एंटिबायोटिक्स लि. पिंपरी ४११०१८ (भारत सरकारचा उपक्रम) यांचे कडुन करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१५१ विषय क्रमांक- ११
दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- स्थापत्य BRTS
सुचक- मा. फुगे भिमाबाई अनुमोदक- मा. भोईर सुरेश
संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.स्था/BRTS/५७९/२०२१, दि.०९/०८/२०२१.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या “हरीत सेतू” कार्यक्रमासाठी तज्ञ सल्लागाराची नेमणुक करणेबाबत.

विषय क्रमांक- ११ चा विचार दि.०१/०९/२०२१ च्या सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१५२ विषय क्रमांक- १२
दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- लेखा विभाग
सुचक- मा. फुगे भिमाबाई अनुमोदक- मा. भोईर सुरेश
संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.लेखा/३१/कावि/१६८/२०२१, दि.०७/०८/२०२१.

मा.आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

शासन निर्णय क्रमांक एनयुआर-२०१३/प्र.क्रं.३३८/नवि-३३ मंत्रालय मुंबई दिनांक १८ फेब्रुवारी २०१४ अन्वये सन २०२०-२१ मध्ये येणा-या अंदाजित संचलनतूटीच्या ४० टक्के रक्कम अदा करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर एकूण तरतूदर.रु.२३८.२१ कोटी करणेत आली असून यामध्ये संचलनतूट १६५.७१ कोटी विविधप्रकारचे पासेस र.रु.२.५० कोटी व बसेस खरेदी र.रु.७०.०० कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रक्कमेतून **माहे ऑगस्ट २०२१** करिता **र.रु.१२,००,००,०००/- (अक्षरी.र.रु.बारा कोटी फक्त)** सन २०२०-२१ च्या अंदाजित संचलनतूटीचे लेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत **माहे ऑगस्ट २०२१** मध्ये अदा करावयाचे असल्याने व सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१५३ विषय क्रमांक- १३
दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- बांधकाम परवानगी
सुचक- मा. फुगे भिमाबाई अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.आयुक्त यांचे पत्र क्र.बीपी/अति/मुख्य/१/कावि/३३८/२०२१, दि.०९/०८/२०२१.

मा. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचेकडील सुचनेनुसार बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम/ अतिक्रमण नियंत्रण निर्मूलन विभागामार्फत महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांच्याकडून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दोन महिन्याकरिता १०० सुरक्षा रक्षकांची मागणी करणेत आली होती. त्याअनुषंगाने म.रा.सु.म. यांचेकडील पत्र जावक क्रं.MSSC/Induction/1584/2021. दि.२६/०७/२०२१ अन्वये संयुक्त सुरक्षा आढावा सर्वे केलेनंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस १८८ सुरक्षारक्षकांची गरज असल्याची शिफारस केली असून त्यांनी त्यांच्याकार्यपध्दतीप्रमाणे सदर सुरक्षारक्षकांचे १ महिन्याचे आगाऊवेतन (+१८% GST) व ३ महिन्याचे वेतनाइतकी अनामत रक्कम (without GST शिवाय) असे एकूण र.रू.१,८६,३४,४४०/- (अक्षरी र.रू.एक कोटी शहाऐंशी लाख चौतीस हजार चारशे चाळीस फक्त) मरासुमकडे अदा करणे आवश्यक असलेबाबत कळविले असून कोरोना विषाणुचा COVID-19 प्रादुर्भाव रोखण्यासाठीकोविड सेंटर हॉस्पीटल,लसीकरण केंद्र कामकाजासाठी व अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण कारवाई कामी सुरक्षा रक्षकाच्यां येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१५४ विषय क्रमांक- १४
दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- स्थापत्य अ मुख्यालय
सुचक- मा. फुगे भिमाबाई अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२०७/२०२१, दि.०९/०८/२०२१.

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.15/5/2021-22 अन्वये प्रभाग क्र.१५ निगडी प्राधिकरण भागातील फुटपाथ विषयक कामे करणे. कामी M/s. SNB & SONS नि.र.रू.62,22,860/- (अक्षरी रक्कम रुपये बासष्ठ लाख बावीस हजार आठशे साठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.6202760/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.6202760/- पेक्षा 37.86% कमी म्हणजेच र.रु. 3854395/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.3900/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु. 20100/- = एकुण र.रु. 3878395/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१५५ विषय क्रमांक- १५

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- मुख्य लेखा परिक्षण

सुचक- मा. फुगे भिमाबाई अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१अ/कावि/९४/२०२१, दि.०४/०८/२०२१.

मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे.

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील **दि.२९.०३.२०२१ ते दि.१८.०४.२०२१** अखेरसंपणा-या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचे व **दि. १९.०४.२०२१ ते ११.०७.२०२१** अखेर खाजगी रुग्णालयामार्फत आकारण्यात येणा-या वैद्यकीय बिलांचे पूर्व / अंतिम लेखापरिक्षण केलेल्या कामकाजाचे मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/१अ/कावि/९४/२०२१, दि.०४/०८/२०२१ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१५६ विषय क्रमांक- १६

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- वृक्षसंवर्धन विभाग

सुचक- मा. भोईर सुरेश अनुमोदक- मा. शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/४३८/२०२१, दि.१०/०८/२०२१.

मा. आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे बीईजी दिघी हद्दीमध्ये ५० हजार वृक्षारोपणाचे दोन वर्षे देखभाल व संरक्षणक काम महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ यांचेकडुन विना निविदा थेट पध्दतीने करून घेणे व त्याप्रमाणे येणारा खर्च र.रू.**२,६२,११,१५४/-** (अक्षरी र.रू.दोन कोटी बासष्ठ लाख अकरा हजार एकशे चोपन्न फक्त) चे खर्चास मान्यता देणेस व त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१५७ विषय क्रमांक- १७

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- वृक्षसंवर्धन विभाग

सुचक- मा. भोईर सुरेश अनुमोदक- मा. शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/४३७/२०२१, दि.१०/०८/२०२१.

मा. आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे बीईजी दिघी हद्दीमध्ये ३० हजार वृक्षारोपण करून दोन वर्षे देखभाल व संरक्षणकामी प्रति रोप ७७९/- याप्रमाणे करणेचे काम महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ यांचेकडुन विना निविदा थेट पध्दतीने करून घेणे व त्याप्रमाणे येणारा खर्च र.रू. २,३३,७९,५६९/- (अक्षरी र.रु. दोन कोटी तेहत्तीस लाख एकोणऐंशी हजार पाचशे एकोणसत्तर फक्त )चे खर्चास मान्यता मिळावी व त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१५८ विषय क्रमांक- १८
दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- ब क्षेत्रिय कार्यालय
सुचक- मा. भोईर सुरेश अनुमोदक- मा. शत्रुघ्न काटे
संदर्भ- मा. आयुक्तसो यांचे पत्र क्र.बक्षे/लेखा/५/कावि/२६६/२०२१, दि.१०/०८/२०२१.
मा. आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ब क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभागाचे सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये“मा.क्षेत्रीय अध्यक्ष वाहन इंधन ”या लेखाशिर्षावर र.रु.९९,०००/- इतकी तरतुद करणेत आली असून अद्यापपर्यत र.रु.६०,०००/- इतका खर्च झालेला असुन र.रु. ३९,०००/- इतकी तरतुद शिल्लक आहे.मार्च २०२२ अखेर शिल्लक तरतुद वजा जाता र.रु.१,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्यामुळे सदरची तरतुद अपुरी पडणार आहे. सन २०२१-२२ “क्षेत्रीय समिती प्रवास खर्च ”या लेखाशिर्षावर ३,००,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे.अद्यापर्यत खर्चझालेला नसून र.रु.३,००,०००/- इतकी तरतुद शिल्लक असून त्यातून तरतुद वर्ग करणे शक्य आहे.त्यामुळे “क्षेत्रीय समिती प्रवास खर्च ”या लेखाशिर्षावरील र.रु.१,००,०००/- “मा.क्षेत्रीय अध्यक्ष वाहन इंधन ”या लेखाशिर्षावर वर्गीकरणाव्दारे उपलब्ध करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१५९ विषय क्रमांक- १९
दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- ई क्षेत्रिय कार्यालय
सुचक- मा. भोईर सुरेश अनुमोदक- मा. शत्रुघ्न काटे
संदर्भ- मा.सहा.आयुक्त यांचे पत्र क्र.ईक्षेका/नि-६/कावि/३५१/२०२१, दि.०६/०८/२०२१.
मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र ‘ अ’ मधील (१ ते १४ ) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१६० विषय क्रमांक- २०
दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- विद्युत मुख्यालय
सुचक- मा. भोईर सुरेश अनुमोदक- मा. शत्रुघ्न काटे
संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/०४/कावि/८४०/२०२१, दि.१०/०८/२०२१.
मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र “अ”मधील 1 ते 4 निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असून मंजूर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१६१ विषय क्रमांक- २१

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार विभाग

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.उप आयुक्तसो यांचे पत्र क्र.मभां/१६/कावि/३५८/२०२१, दि.१२/०८/२०२१.

मा.उप आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

कोरोना-19 च्या तिस-या लाटेसाठी मनपाचे वाय.सी.एम. रुग्णालयांतील NICU, PICU पेडिएट्रिक वॉर्डकरीता आवश्यक विविध साहित्य/ उपकरणे खरेदीकामी अल्प मुदत ई नि सु क्र. 22/2021-22 नुसार प्राप्त लघुत्तम निविदाकार मे कोठारी मेडीकल, पिंपरी यांचे बाब क्र. 01-Radiant Warmers with Trolley साठी एकुण र.रु.11,69,325/- हे अंदाजपत्रकीय दर र.रु.15,00,000/- पेक्षा 22.05 टक्केने कमी व लघुत्तम आहेत. तसेच मे निर्मीती इंजिनिअरींग कॉर्पोरेशन, पिंपरी यांचे बाब क्र.02 - Phototherapy Double Surface LED साठी एकुण र.रु.10,35,240/- हे अंदाजपत्रकीय दर र.रु.12,50,000/- पेक्षा 17.18 टक्केने कमी व लघुत्तम आहेत. सदरचे दर स्विकृत करणेत आले आहेत. तसेच सदर कामापोटी करारनामा करणेत आला असुन सदर करारनामा साक्षांकित करणेत आला आहे. त्यानुसार मे कोठारी मेडीकल, पिंपरी व मे निर्मीती इंजिनिअरींग कॉर्पोरेशन, पिंपरी यांना पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. तरी सदर साहित्याच्या खरेदीसाठी मे कोठारी मेडीकल, पिंपरी यांचे बाब क्र. 01 साठी एकुण र.रु.11,69,325/- व मे निर्मीती इंजिनिअरींग कॉर्पोरेशन, पिंपरी यांचे बाब क्र. 02 साठी एकुण र.रु.10,35,240/- असे एकुण र.रु.22,04,565/- रक्कमेच्या येणा-या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१६२ विषय क्रमांक- २२

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- माहिती व तंत्रज्ञान

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा. आयुक्तसो यांचे पत्र क्र.मातंवि/१२/कावि/२६५/२०२१, दि.०८/०७/२०२१.

विषय- महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांमध्ये इंटरनेट बॅण्डविड्थ सेवा उपलब्ध करुन देणेबाबत.

विषय क्रमांक- २२ चा विचार दि.०१/०९/२०२१ च्या सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१६३ विषय क्रमांक- २३

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- स्थापत्य ड मुख्यालय

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/४८३/२०२१, दि.१२/०८/२०२१.

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/16/11/2021-22 अन्वये प्र.क्र.२५ पुनावळे

व प्रभागातील इतर परिसरामधील रस्त्यांची हॉटमिक्स पध्दतीने दुरुस्तीची कामे करणे व आवश्यकतेनुसार रस्त्यांचे डांबरीकरण करणे (सन २०२०-२१ करीता) कामी मे.शिवम एंटरप्रायझेस नि.र.रू. 41,52,292/- (अक्षरी रक्कम रुपये एकेचाळीस लाख बावन्न हजार दोनशे ब्यान्नौ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु. 40,85,892/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु. 40,85,892/- पेक्षा 42.57% कमी म्हणजेच र.रु. 23,46,528/- +रॉयल्टी चार्जेस र.रु. 4,240/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु. 66,400/- = एकुण र.रु. 24,17,168 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१६४ विषय क्रमांक- २४

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- स्थापत्य क मुख्यालय

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/४८४/२०२१, दि.१२/०८/२०२१.

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/16/14/2021-22 अन्वये प्र.क्र.२५ वाकड व प्रभागातील इतर परिसरातील रस्त्यांची हॉटमिक्स पध्दतीने दुरुस्तीची कामे करणे व आवश्यकतेनुसार रस्त्याचे डांबरीकरण करणे (सन २०२०-२१ करीता) कामी मे.शिवम एंटरप्रायझेस नि.र.रू. 41,53,122/- (अक्षरी रक्कम रुपये एकेचाळीस लाख त्रेपन्न हजार एकशे बावीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु. 40,86,722/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु. 40,86,722/- पेक्षा 42.62% कमी म्हणजेच र.रु. 23,44,961 /- +रॉयल्टी चार्जेस र.रु. 4,240/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु. 66,400/- = एकुण र.रु. 24,15,601 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१६५ विषय क्रमांक- २५
दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- स्थापत्य क मुख्यालय
सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ
संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/४८५/२०२१, दि.१२/०८/२०२१.

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/16/15/2021-22 अन्वये प्र.क्र.२५ ताथवडे व प्रभागातील इतर परिसरामधील रस्त्यांची हॉटमिक्स पध्दतीने दुरुस्तीची कामे करणे व आवश्यकतेनुसार रस्त्याचे डांबरीकरण करणे (सन २०२०-२१ करीता) कामी मे.शिवम एंटरप्रायझेस नि.र.रू. 41,52,541/- (अक्षरी रक्कम रुपये एकेचाळीस लाख बावन्न हजार पाचशे एकेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु. 40,86,141/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु. 40,86,141/- पेक्षा 42.63% कमी म्हणजेच र.रु. 23,44,219 /- +रॉयल्टी चार्जेस र.रु. 4,240/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु. 66,400/- = एकुण र.रु. 24,14,859/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१६६ विषय क्रमांक- २६
दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- स्थापत्य ब मुख्यालय
सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ
संदर्भ- मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/९५६/२०२१, दि.१३/०८/२०२१.

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभाग ब मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (१ ते २०) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१६७ विषय क्रमांक- २७
दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- वैद्यकीय विभाग
सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश
संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/७४५/२०२१, दि.१२/०८/२०२१.
विषय- M/s. Jess Ideas Pvt. Ltd. यांना मुदतवाढ दिलेबाबत.

विषय क्रमांक- २७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१६८ विषय क्रमांक- २८

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- वैद्यकीय विभाग

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/७४२/२०२१, दि.१२/०८/२०२१.

मा. आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात कोरोना रुग्णांची संख्या पुन्हा वाढु लागले नंतर मा.आयुक्त यांचेकडील दि.०९.०४.२०२१ चे मान्य प्रस्तावान्वये M/s.Cellbeans Healthcare Informatics Pvt. Ltd. यांना क्र.मसाभां/४/कावि/३१९/२०२१ दि.१२/०४/२०२१ र.रु.५,९०,०००/- दि.२८/०३/२०२१ ते दि.२७/०५/२०२१ पर्यंतच्या कामासाठी आदेस देणेत आले होते. सदर खर्चास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९२६४ दि.२३.०४.२०२१ अन्वये मान्यता घेणेत आलेली आहे. M/s.Cellbeans Healthcare Informatics Pvt. Ltd. यांचे बरोबर दि.२४.०४.२०२१ रोजी करारनामा करणेत आलेला आहे. नोडल अधिकारी यांनी M/s.Cellbeans Healthcare Informatics Pvt. Ltd. यांचे आदेशाचे मुदतीनंतर पत्र क्र.आ.म.स्टे/कावि/३१९/२०२१ दि.०७/०६/२०२१ चे पत्रान्वये तीन महीने मुदतवाढ देणेकामी कळविले आहे. मा.आयुक्त यांचे सुचने प्रमाणे कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो हॉस्पिटल येथे नियुक्त असलेल्या एजन्सी बाबत निर्णय घेणेकामी समितीची नियुक्ती करुन मिटींग घेणेबाबत कलविले होते. त्या प्रमाणे मा.अति.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली सदर मिटींगमध्ये M/s.Cellbeans Healthcare Informatics Pvt. Ltd. यांना दि.१५/०८/२०२१ पर्यंत मुदतवाढ देणेकामी निर्णय घेणेत आला. त्या प्रमाणे M/s.CellBeans Healthcare Informatics Pvt. Ltd. यांना दि.२८/०५/२०२१ ते दि.१२/०८/२०२१ या कालावधीसाठी एकूण र.रु.७,३७,५००/- चे कामकाज आदेश देणेत आले आहेत. सदर कामाच्या होणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१६९ विषय क्रमांक- २९

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- स्थापत्य मुख्यालय

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.स्था/तां/शअ/०४/२६४/२०२१, दि.०९/०८/२०२१.

मा. आयुक्तसो यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही एक विकसनशील 'अ' वर्ग महानगरपालिका असून तिचा विस्तार झपाट्याने होत आहे.डिसेंबर २०१९ पासून जगात कोरोना कोविड-१९ या आंतरराष्ट्रीय संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असल्याने संपुर्ण देशभर मार्च २०२० पासून टाळेबंदी (Lockdown) लागल्याने विकास थांबलेला असून महानगरपालिका क्षेत्रात कोविड-१९ चा प्रादुर्भाव प्रभावीपणे रोखण्यासाठी कराव्या लागत असलेल्या उपाययोजनांसाठी महानगरपालिकेवर

मोठा आर्थिक बोजा पडलेला असून मनुष्यबळ वळवावे लागलेले आहे. टाळेबंदीमुळे विकास थंडावला असल्याने बांधकाम परवानगी, एल.बी.टी., करसंकलन इत्यादी स्त्रोतांव्दारे महानगरपालिकेस मिळणारा महसूल घटलेला असल्याने अत्यावश्यक अशा स्वरूपाची मोठी विकास कामे राबविणे सध्या आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. आर्थिक अडचणीमुळे सध्या सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण हे दोन्ही विभाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्र.योजना२०१७/प्र.क्र.५८/नियोजन-१अ, दि.०३/११/२०१७ नुसार HAM (Hybrid Annuity Model) या पध्दतीने मोठी विकास कामे राबवत आहेत. या पध्दतीमध्ये प्रकल्पाची ६०% रक्कम ही शासनाची असून उर्वरीत ४०% रक्कम ही विकसकाने गुंतवावयाची असून केलेल्या कामाचे देयक विकसकास टप्प्याटप्प्याने देणेचा अंतर्भाव आहे. सदरच्या प्रणालीचा वापर करून महानगरपालिकेच्या विकासकामांच्या निविदा काढण्यात याव्यात असे स्थापत्य विभागाचे मत आहे. HAM कार्यप्रणालीच्या ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत, कार्यप्रणाली समजणेसाठी रस्त्याचे काम र.रू.१०० कोटीचे आहे असे समजावे, यामध्ये ६०% रक्कम मनपाला ठेकेदारास २ वर्षामध्ये द्यावी लागेल म्हणजेच र.रू.३० कोटी प्रतिवर्षी याप्रमाणे र.रू.६० कोटी २ वर्षामध्ये, उर्वरीत ४०% रक्कम ठेकेदाराला स्वतः टाकावयाची आहे. यामध्ये त्रिकोणी करार (Tri Party Agreement) करार केला जातो शासन, ठेकेदार व बँक यांच्यात Escrow प्रकारचे बँक खाते उघडण्यात येते. कामाची मुदत २ वर्ष असेल असे समजले तर शासनास कामाच्या आदेशासोबत र.रू.३० कोटी व पुढील वर्षी ३० कोटी रक्कम Escrow खात्यामध्ये टाकावी लागता ठेकेदारास २०% प्रमाणे कामाच्या कालावधीमध्ये काम पूर्ण होईपर्यंत एकुण ५ बिले दिली जातात. कामाच्या प्रगतीप्रमाणे शासनाने प्रमाणित केलेनंतर बँक Escrow खात्यामधून ठेकेदारास पैसे अदायगी करते. या योजनेमध्ये कामाचा दोष दायित्व कालावधी (DLP) १० वर्ष असतो. मूळ मुदतीमध्ये फक्त ६०% रक्कमच शासनामार्फत ठेकेदाराला दिली जाते. २ वर्षानंतर काम पूर्ण झालेनंतर उर्वरीत ४०% रक्कम ही २० समान हप्त्यामध्ये म्हणजेच प्रत्येक ६ महिन्यानंतर १ हप्ता अशी १० वर्षात रक्कम दिली जाते. दर ५ वर्षानंतर ठेकेदारास डांबर, कॉक्रीटचा एक थर करावा लागतो व रस्ता हस्तांतरित करताना ८ वर्षानंतर पुन्हा Bituminous कॉक्रीटचा एक थर करून रस्ता शासनास हस्तांतरित करावा लागतो. यामध्ये रस्त्याचे डिझाईन हे ठेकेदाराचे स्वतःचे असते. रस्ता पूर्ण झालेनंतर दर ६ महिन्यानंतर ठेकेदारास प्रत्येक हप्ता देताना ठेकेदाराने रस्त्याच्या देखभाल दुरूस्तीबाबतच्या कोणत्या जबाबदा-या पूर्ण कराव्यात याची नियमावली NHAIने तयार करणेत आलेली आहे.

उदा. १) दर २ वर्षानंतर थर्मप्लास्ट पेन्ट पुनश्च पेन्ट करणे दर.

२) दर २ वर्षानंतर साईन बोर्ड बदलणे.

३) रस्त्यावरील खड्डे बुजविणे तसेच खड्ड्यांची दुरूस्त करणे.

४) रस्त्याचा एखादा भाग दुरूस्ती करणे योग्य नसेल तर तेवढा भाग पुनःश्च नव्याने तयार करणे इ. प्रत्येक ६ महिन्यांनी रस्त्याची तपासणी करणेत येत असलेमुळे व DLP १० वर्ष इतका असलेमुळे रस्त्याची गुणवत्ता राखण्यास मदत होते. हे सर्व करताना ठेकेदाराला २ वेळा करावा लागणारा BC चा खर्च, DLP कालावधीतील देखभाल

दुरूस्तीचा खर्च, भाववाढ व ठेकेदाराने प्रकल्पाकरीता केलेल्या ४०% गुतंवणुकीवरील व्याज याची सुसुत्रपणे अंमलबजावणी करणेसाठी मार्गदर्शिका तयार करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिकेला HAM या कार्यप्रणालीचा अवलंब करताना कोणतीही अडचण येणार नाही व अशा पद्धतीने केलेल्या कामांना मान्यता घेऊन निविदा काढल्या तर मनपाला एकुण कामाच्या ३०% रक्कम देवून सुध्दा मोठ्या पध्दतीची कामे करणे शक्य आहे. कामांमध्ये मनपाचे मनुष्यबळ कमी लागेल व गुणवत्तेची पूर्ण जबाबदारी ठेकेदाराची असल्यामुळे केलेल्या कामाचा दर्जा १० वर्षापर्यंत राखण्याची हमी देखील मिळेल.

सदर HAM या कार्यप्रणालीचा वापर करून मनपा हद्दीमध्ये रस्त्यांची कामे करणेकरिता खालील नमुद केलेल्या बाबी आवश्यक आहेत.

- कमीत कमी ८०% जागा ताब्यात असणे आवश्यक आहे.
- सदरची कार्यप्रणाली फक्त D.P. तील रस्त्याकरीता लागू राहिल.
- पाणीपुरवठा, जलनिःसारण विद्युत यांची कामे रस्त्यासोबतच होणे असणे आवश्यक आहे.
- रस्त्यांची रूंदी १८ मी व १८ मी पेक्षा जास्त असावी तसेच प्रकल्पाची किंमत ३० कोटीच्या पुढे असावी.

सध्यस्थितीत महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता, HAM च्या धर्तीवर म.न.पा. मध्ये पूर्णतः नव्याने तयार करण्याचा ज्या डीपी रस्त्यांची कमीत कमी ८०% जागा मनपाच्या ताब्यात आहे, व ज्या प्रकल्पाची किंमत ३० कोटीच्या पुढे आहे अशा रस्त्यांची विकास कामे राबविणे योग्य होईल असे वाटते, ज्यायोगे महानगरपालिकेचा विकासच होईल. तरी वरीलप्रमाणे HAM प्रणालीचा वापर करून महानगरपालिकेतील रस्त्यांची कामे करणेबाबत मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१७० | विषय क्रमांक- ३०

दिनांक- १८/०८/२०२१ | विभाग- पशुवैद्यकीय विभाग

सुचक- मा. शत्रुघ्न काटे | अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.पवै/३/कावि/२६६/२०२१, दि.१०/०८/२०२१.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालय या क्युरेटर व पशुवैद्यक या अभिनामाचे पदावर हंगामी (तात्पुरत्या) स्वरुपात फेरनियुक्त करणेबाबत.

विषय क्रमांक- ३० चा विचार दि.०१/०९/२०२१ च्या सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेण्यात आले.**

ठराव क्रमांक- १०१७१ विषय क्रमांक- ३१

दिनांक- १८/०८/२०२१

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३ मधील विकास कामांना प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढ/ घट करणेस मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/ घट रक्कम रु.८०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१७२ विषय क्रमांक- ३२

दिनांक- १८/०८/२०२१

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.११ मधील पुर्णानगर येथील सी.डी.सी. मोकळी जागा क्र.३ येथे बहुउद्देशीय इमारत बांधण्याचे काम चालू आहे. सदर कामाच्या मनपाच्या सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रकात तरतूद उपलब्धतेच्या मर्यादेमुळे अपुरी तरतूद करणेस आली होती. तथापि सद्यस्थितीत सदर कामाचे देयक अदायगी करीत तरतूद उपलब्ध नाही. तरी प्रस्तावात नमुद काम विहित वेळेत पुर्ण करण्यकरीता प्रस्तावात नमूद अंतर्गत तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.(वाढ/ घट र.रू.३६,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१७३ विषय क्रमांक- ३३

दिनांक- १८/०८/२०२१

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

मा. स्थायी समिती ठराव क्र. ८९६६ दि. १०/०३/२०२१ अन्वये Majoj Kusalkar Tennis Academy यांचे नावामध्ये Manoj Kusalkar Tennis Academy व दोन लॉग टेनिस कोर्ट ऐवजी क्र.१ व २ टेनिस कोर्ट अशी दुरूस्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१७४ विषय क्रमांक- ३४

दिनांक- १८/०८/२०२१

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत कारवाई करत असताना भाजीविक्रेते, फळविक्रेते यांच्यामध्ये महिला विक्रेत्या देखील असतात. सध्या अतिक्रमण करवाई करत असताना महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकामध्ये केवळ पुरुष कर्मचारी असतात. महिला विक्रेते व पुरुष कर्मचारी यांच्यात वादविवादाचे प्रसंग निर्माण होवून महापालिका कर्मचारी वर्गावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्याची धमकी महिला विक्रेत्यांकडून वारंवार देण्यात येत आहे. त्यामुळे महापालिका कर्मचारी वर्गाच्या सुरक्षिततेच्या व हिताच्या तसेच महापालिका सर्व क्षेत्रिय कार्यालय अतिक्रमण विभागाचे सक्षमिकरणाच्या दृष्टीकोनातून सर्व आठ क्षेत्रिय कार्यालय निहाय प्रत्येकी ५ अशा एकूण ४० महिला सुरक्षा रक्षक कर्मचा-यांची मानधन तत्वावर प्रत्येकी मानधन र.रु.२५,०००/- व एकूण दोन वर्ष कालावधीसाठी मे.के.के.मॅनेजमेंट या खाजगी ठेकेदारी संस्थेद्वारे नियुक्तीस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१७५ विषय क्रमांक- ३५

दिनांक- १८/०८/२०२१

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर एक्सरे-टेक्निशिअन अभिनामाची १० पदे बी. एस. सी भौतिकशास्त्र व एक्सरे टेक्निशिअन या अर्हतेमध्ये मंजूर आहेत. तथापी या अर्हतेमध्ये उमेदवार उपलब्ध होत नसल्यामुळे १२ वी शास्त्र व एक्सरे-टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण या प्रमाणे अर्हता शिथील करून भरलेल्या ८ पैकी ६ कर्मचा-यांना पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. मात्र अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होत नसल्याने एस.टी. प्रवर्गातील अनुशेष शिल्लक आहे. अनुशेष भरण्याबाबत प्रयत्न करूनही उमेदवार उपलब्ध होत नाही. श्री. यशवंत सोपान डावखर, पदनाम वॉर्डबॉय हे १२ वी शास्त्र व एक्सरे-टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण असून एस.टी. प्रवर्गातील आहेत. तसेच ते मनपाच्या रूग्णालयात वॉर्डबॉय पदावर ८ वर्षापासून नियमीत वेतनश्रेणीत काम करत आहेत. या सर्व बाबींचा विचार करता श्री.यशवंत सोपान डावखर, वॉर्डबॉय हे १२ वी शास्त्र व एक्सरे-टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण ही अर्हता धारण करीत असून एस.टी. प्रवर्गातील मनपा कर्मचारी आहेत. एक्सरे-टेक्निशिअन पदाचा एस.टी. प्रवर्गाचा अनुशेष असून यापुर्वी शैक्षणिक अर्हता शिथील करून एक्सरे-टेक्निशिअन पदावर नियुक्ती दिली आहे. त्यानुसार श्री.यशवंत सोपान डावखर, वॉर्डबॉय यांना बी.एस.सी भौतिकशास्त्र ही अर्हता शिथील करून त्यांना एक्सरे-टेक्निशिअन पदावर नियुक्ती देवून एस.टी. प्रवर्गातील अनुशेष भरून काढण्यास मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१७६ विषय क्रमांक- ३६

दिनांक- १८/०८/२०२१

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या Covid Care Centre मधील रूग्णांना मध्यवर्ती भांडार विभागाच्या आदेशानुसार सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. हे सन २०२० पासून भोजन व नाष्ट्याचा पुरवठा करत आहेत. पुरवठा आदेशामध्ये दुधाचा समावेश नाही. परंतू कामाच्या आदेशापासून आजतागायत ते दुधाचा पुरवठा करीत आहेत. त्यामुळे त्यांना महापालिकेच्या मंजूर दरानुसार पुरवठा केलेल्या दुधाच्या बिलाची रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१७७ विषय क्रमांक- ३७

दिनांक- १८/०८/२०२१

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

प्राधिकरण से.क्र.२४ येथे लाल बहादूर शास्त्री चौकाजवळ सार्वजनिक सुविधा केंद्राकरीता भूखंड आरक्षित आहे. सदर भूखंडाच्या काही भागावर जुने अग्निशामक केंद्र अस्तित्वात आहे. जुन्या अग्निशामक केंद्रामध्ये सद्य स्थितीत एकच अग्निशामक वाहन (बंब) ठेवण्याची व्यवस्था आहे. सदर व्यवस्था अपुरी असून सदर आरक्षित जागेवर नविन अग्निशामक केंद्र इमारत वैद्यकीय सुविधा केंद्रासह बांधणे आवश्यक असून सदर कामाचा मनपाच्या सन २०२१-२२ च्या अंदापत्रकामध्ये खालील नमुद प्रमाणे समावेश करुन त्याकरीता तरतूद करणे व प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात यात आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय र.रु. | सन २०२१-२२ची तरतूद र.रु. | वाढ | घट | एकूण तरतूद र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१५ मधील लाल बहादुर शास्त्री चौकाजवळील आरक्षित जागेवर नविन अग्निशामक केंद्र इमारत, वैद्यकीय सुविधा केंद्रासह (Medical Aid) बांधणे. | विशेष योजना | ७,००,००,००० | ० | १५,००,००० | ० | १५,००,००० |
| २ | प्रभाग क्र.१५ काचघर चौकाजवळील आरक्षित जागेवर नविन OPD इमारत बांधणे व अग्निशामक केंद्र इमारतीचे नुतणीकरण करणे. | विशेष योजना | ४,००,००,००० | १५,००,००० | ० | १५,००,००० | ० |

तरी वरील प्रमाणे कामाचा मनपाच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन तरतूद करणेस तसेच मा. महापालिकासभेकडे शिफारस करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१७८ विषय क्रमांक- ३८

दिनांक- १८/०८/२०२१ विभाग- माहिती व जनसंपर्क

सुचक- मा. बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा. कांबळे अंबरनाथ

संदर्भ- मा. आयुक्तसो यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/४३६/२०२१, दि.१८/०८/२०२१.

महापालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागाकडे सन २०२१-२०२२ करीता थोर राष्ट्रपुरुष/ महापुरुष विचारांचा प्रचार करणे, प्रबोधनात्मक कार्यक्रम यासाठी र.रु.५५,००,०००/- (र.रु.पंचावन्न लाख फक्त) इतकी तरतूद मंजूर असून त्यापैकी र.रु.४०,१५७/- इतकी तरतूद शिल्लक आहे. सदर शिल्लक रक्कम ही अपूरी पडत असल्याने त्याकरीता या विभागाकडील "इतर खर्च" या लेखाशिर्षामधील शिल्लक र.रु.५५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंच्चावन्न लाख फक्त) पैकी र.रु.४०,००,०००/- (अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त) इतकी रक्कम "राष्ट्रपुरुष/ महापुरुषांच्या विचारांचा प्रसार करणे" या लेखाशिर्षावर वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अॅड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे)
सभापती, स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.

(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८, नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/१४४९/२०२१
दिनांक - १८/०८/२०२१

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

(क्र.मभां/०८/कावि/१२८९/२०२१ दि.०६/०८/२०२१ विषय क्र.६ चे लगत)

(६)

प्रपत्र -अ

जिल्हाधिकारी पुणे तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणे जिल्हाधिकारी कार्यालय , पुणे यांचेकडुन प्राप्त झालेल्या रेमडेसिवीर इंजेक्शेनचे मजुर संख्येनुसार खालील पुरवठाधारकांनी पुरवठा केला आहे.

| अ.क्र. | मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडील आदेश क्र. | मा.जिल्हाधिकारी यांनी मजुर केलेला दिनांक | प्राप्त दिनांक | पुरवठा आदेश क्र. व दिनांक | पुरवठाधारकांचे नाव | औषधाचे नाव | उत्पादीत कंपनी | मंजुर संख्या | दर ( सर्व करासहीत) | एकुण र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जि.का./नै.आ./कोविड-१९/कावि/५६/२०२१ , दिनांक- १८/५/२०२१ | १८-०५-२०२१ | 20-05-2021 | CSD/363/2021.Dt -20/05/2021 | Chandan Pharmaceuticals | Inj.Remdesivir 100mg | Cipla | 30 | 2241 | 67230 |
| २ | जि.का./नै.आ./कोविड-१९/कावि/५६/२०२१ , दिनांक- १८/५/२०२१ | १८-०५-२०२१ | 20-05-2021 | CSD/364/2021.Dt -20/05/2021 | Kundan Agency | Inj.Remdesivir 100mg | Cipla | 100 | 2241 | 224100 |
| ३ | जि.का./नै.आ./कोविड-१९/कावि/५६/२०२१ , दिनांक- १८/५/२०२१ | १८-०५-२०२१ | 19-05-2021 | CSD/362/2021. Dt-19/05/2021 | Parshwanath Critical Care | Inj.Remdesivir 100mg | Hetero | 8 | 3080 | 24640 |
| | | | | | | | | | एकुण र.रु. | 315970 |

६/८/२१

अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

Scanned with CamScanner

(क्र.इक्षेका/नि-६/कावि/३५१/२०२१ दि.०६/०८/२०२१ विषय क्र.१९ चे लगत)

(6)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी 39

(विषयपत्र क्र.इक्षेका/नि-6/कावि/ 351 /2021 दि. 6/8/2021 लगत)

प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.सुजाता कन्स्ट्रक्शन | E ZONE/CIVIL/3-14-2020-2021 | प्रभाग क्र. ३मधील मोशी - च-होली मधील स्थापत्य विषयक कामे करणे. | 1/6/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 318/2021 | 22/6/2021 | 819292 | 807592 | 7350 | 11700 | 40.01.00 % कमी | 503524/- |
| 2 | मे.सुजाता कन्स्ट्रक्शन | E ZONE/CIVIL/3-21-2020-2021 | प्र.क्र. ३मधील च-होली मध्ये मनपा शाळेची किरकोळ दुरुस्ती कामे करणे. | 1/6/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 320/2021 | 22/6/2021 | 824910 | 813210 | 2685 | 11700 | 41.01% कमी | 494098/- |
| 3 | मे.आर एस एंटरप्रायजेस | E ZONE/CIVIL/3-25-2020-2021 | प्रभाग क्र.८ मधील दिघी येथे वाचनालयांची सुधारणा करणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | 10/5/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 3212021 | 22/6/2021 | 821903 | 810203 | 3533 | 11700 | 37.52% कमी | 521448/- |
| 4 | मे. सुनिल बाबुराव पांचाळ | E ZONE/CIVIL/1-36-2020-2021 | प्रभाग क्र. ५ सॅन्डविक कॉलनी मध्ये स्थापत्य विषयक कामांची सुधारणा करणे. | 31/5/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 333/2021 | 1/7/2021 | 816778 | 790438 | 13782 | 26350 | 24.50% कमी | 636905/- |
| 5 | मे. सुनिल बाबुराव पांचाळ | E ZONE/CIVIL/3-38-2020-2021 | प्रभाग क्र. ५ गवळीनगर व सॅन्डविक कॉलनी मध्ये ठिकठिकाणचे राडारोडा उचलणे व स्थापत्य विषयक | 31/5/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 334/2021 | 1/7/2021 | 819870 | 793520 | 10364 | 26350 | 24.50% कमी | 635822/- |



Scanned with CamScanner

(19)

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | मे. पांडुरंग कन्स्ट्रक्शन | E ZONE/CIVIL/3-39-2020-2021 | प्रभाग क्र. ७ भोसरी गावठाण व इतर परिसरात ठिकठिकाणी खडी मुरुम व बीबीएम पध्दतीने रस्त्यांचे सुधारणा करणे. | 1/06/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 319/2021 | 22/6/2021 | 821274 | 790674 | 7350 | 30600 | 40.01% कमी | 512275/- |
| 7 | मे. एस. एस. एंटरप्रायजेस | E ZONE/CIVIL/3-40-2020-2021 | प्रभाग क्र.७ गव्हाणेवस्ती व इतर परिसरात मध्ये थर्मोप्लास्टर पेंट देणे, बेंचेस बसविणे व अनुषंगिक कामे करणे. | 10/5/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 323/2021 | 22/6/2021 | 821037 | 809337 | 7067 | 11700 | 38.55% कमी | 516105/- |
| 8 | मे. एस. एस. एंटरप्रायजेस | E ZONE/CIVIL/3-42-2020-2021 | प्रभाग क्र. ७ भोसरी परीसरातील रोड फर्निचर व इतर अनुषंगिक कामे करणे. | 10/5/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 322/2021 | 22/6/2021 | 821184 | 809484 | 7067 | 11700 | 35.99% कमी | 536918/- |
| 9 | मे. योहान इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रक्टर्स | E ZONE/CIVIL/1-10-2020-2021 | प्रभाग क्र.७ भोसरी येथील डांबरी रस्त्यांची दुरुस्ती करणे | 9/3/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 313/2021 | 8/6/2021 | 827469 | 754369 | 2120 | 73100 | 27.27% कमी | 623873/- |
| 10 | मे. योहान इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रक्टर्स | E ZONE/CIVIL/1-16-2020-2021 | प्रभाग क्र.५ मधील विविध ठिकाणचे रस्त्यावरील चर व खड्डे डांबरीकरणाने दुरुस्ती करणे. | 9/3/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 315/2021 | 8/6/2021 | 832555 | 757405 | 1603 | 75150 | 29.00% कमी | 614511/- |
| 11 | मे. योहान इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रक्टर्स | E ZONE/CIVIL/1-17-2020-2021 | प्रभाग क्र.५ मधील विविध ठिकाणचे रस्ते डांबरीकरणाने दुरुस्ती करणे. | 9/3/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 314/2021 | 8/6/2021 | 832988 | 757838 | 1431 | 75150 | 28.00% कमी | 622224/- |
| 12 | मे. सुजाता कन्स्ट्रक्शन | E ZONE/CIVIL/1-37-2020-2021 | प्रभाग क्र. ५ मध्ये साईन बोर्ड बेचेंस बसविणे व इतर अनुषंगीक कामे करणे | 6/07/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/ 345/2021 | 15/7/2021 | 825616 | 795716 | 4325 | 29900 | 37.00% कमी | 535526/- |



Scanned with CamScanner

19

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | मे. जाधव कन्स्ट्रक्शन कंपनी | E ZONE/CIVIL/1-33-2020-2021 | प्रभाग क्र. ८ मधील बोपखेल येथील पेवर ब्लॉक व स्थापत्य विषयक कामे करणे | 6/7/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/346/2021 | 15/7/2021 | 819292 | 807592 | 7491 | 11700 | 23.70% कमी | 635384/- |
| १४ | मे. जाधव कन्स्ट्रक्शन कंपनी | E ZONE/CIVIL/1-32-2020-2021 | प्रभाग क्र. ८ मधील दिघी येथील पेवर ब्लॉक व स्थापत्य विषयक कामे करणे | 6/7/2021 | क्र.इक्षेका/6/कावि/347/2021 | 15/7/2021 | 821461 | 809761 | 5936 | 11700 | 25.70% कमी | 619288/- |
| | एकुण | | | | | | | | | | | 8007901/- |

(राजेश आगळे)
सहाय्यक आयुक्त
तथा
क्षेत्रिय अधिकारी
इ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी ३९

Scanned with CamScanner

(क्र.विमुका/०४/कावि/८४०/२०२१ दि.१०/०८/२०२१ विषय क्र.२० चे लगत)

23

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी - 411 018.
विद्युत मुख्यालय
प्रपत्र - अ
पत्र क्र. विमुका/04/कावि/ 840 /2021 दि. 10 /08/2021 चे लगत

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा नोटीस क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाच्या आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. के. एस. इलेक्ट्रीकल्स एन्ड एन्टरप्रायजेस | 39-04/2020-2021 | प्रभाग क्र. 23 मधील मुख्य रस्त्यावर सुशोभित पथदिव्यांचे पोल उभारणे (2020-2021) | 11-06-21 | विमुका/4/कावि/816/2021 | 23-07-21 | 750004 | 18.99 | कमी% + G.S.T. | 607578 |
| 2 | मे. के. एस. इलेक्ट्रीकल्स एन्ड एन्टरप्रायजेस | 39-05/2020-2021 | प्रभाग क्र. 24 मधील मुख्य रस्त्यावर सुशोभित पथदिव्यांचे पोल उभारणे (2020-2021) | 11-06-21 | विमुका/4/कावि/814/2021 | 23-07-21 | 750004 | 18.99 | कमी% + G.S.T. | 607578 |
| 3 | मे. यश इलेक्ट्रो लाईन | 39-16/2020-2021 | प्रभाग क्र. 21 मधील मुख्य रस्त्यावर सुशोभित पथदिव्यांचे पोल उभारणे (2020-2021) | 07-07-21 | विमुका/4/कावि/828/2021 | 02-08-21 | 1020690 | 13.29 | कमी% + G.S.T. | 885040 |
| 4 | मे. यश इलेक्ट्रो लाईन | 39-17/2020-2021 | प्रभाग क्र. 27 मधील मुख्य रस्त्यावर सुशोभित पथदिव्यांचे पोल उभारणे (2020-2021) | 07-07-21 | विमुका/4/कावि/830/2021 | 02-08-21 | 1020690 | 13.29 | कमी% + G.S.T. | 885040 |
| | | | | | | | 3541388 | | | 2985236 |

(संदेश चव्हाण) 10/08
सह शहर अभियंता (वि/यां)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411 018.

Scanned with CamScanner

(क्र.स्था/नि/२-ब/९५६/२०२१ दि.१३/०८/२०२१ विषय क्र.२६ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य व मुख्यालय
क्र.स्था/नि/२-ब/956/2021
दि.13/08/2021

26

प्रपत्र अ ( 1 ते 20 )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा सर्वांची वाटाघाटीची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करणेत येईल ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | श्री. साई कंन्स्ट्रक्शन | 46/8/2020-21 | मन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१६ मध्ये आदर्शनगर मामुर्डी आझादनगर येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | 01/07/2021 | स्था/नि/२-ब/955/2021 | 09/08/2021 | 14,99,419 | 14,65,069 | 2,430 | 34,350 | 36.77 % कमी | 9,63,143 |
| २ | श्री. साई कंन्स्ट्रक्शन | 46/9/2020-21 | मन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१६ मध्ये विकासनगर किवळे येथे बापदेवनगर दत्तनगर भीमाशंकर नगर येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | 01/07/2021 | स्था/नि/२-ब/954/2021 | 09/08/2021 | 22,49,292 | 22,14,942 | 2,136 | 34,350 | 37.77 % कमी | 14,14,844 |
| ३ | मे. आर.जी. मंगलवेडेकर | 46/11/2020-21 | प्रभाग क्र.१६ मध्ये विकासनगर विहीरीवर आर.सी.सी. कल्वर्ट बांधणे | 25/03/2021 | स्था/नि/२-ब/928/2021 | 24/06/2021 | 24,75,082 | 23,80,832 | 14,095 | 94,250 | 18.77 % कमी | 20,42,295 |
| ४ | मे. भालेराव कंन्स्ट्रक्शन | 46/22/2020-21 | मन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मधील भोंडवे वस्ती परिसरात पेव्हिंग ब्लॉकची कामे करणे. | 31/03/2021 | स्था/नि/२-ब/920/2021 | 18/06/2021 | 22,25,850 | 21,91,500 | 3,088 | 34,350 | 15.15 % कमी | 18,96,926 |
| ५ | मे. व्यंकटेश्वरा बिल्डर्स अँण्ड डेव्हेलपर्स | 46/24/2020-21 | मन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मोटे चाळ, स्वामी समर्थ मठ, शिवशक्ति कॉलनी, वृंदावन कॉलनी चिंचवडेनगर भागातील रहिवाशी कॉलन्या येथे फुटपाथ व पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दुरूस्ती करणे. | 15/06/2021 | स्था/नि/२-ब/921/2021 | 18/06/2021 | 22,23,888 | 21,89,538 | 3,088 | 34,350 | 13.00 % कमी | 19,42,336 |
| ६ | मे. भालेराव कंन्स्ट्रक्शन | 46/25/2020-21 | मन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मोगा सुपर मार्केट लाईन, ओमसाई कॉलनी, माने कॉलनी, शिवसाई कॉलनी चिंचवडेनगर भागातील रहिवाशी कॉलन्या येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दुरूस्त करणे. | 27/05/2021 | स्था/नि/२-ब/918/2021 | 18/06/2021 | 22,25,270 | 21,90,920 | 3,088 | 34,350 | 38.85 % कमी | 13,77,186 |

Scanned with CamScanner

प्रपत्र अ ( 1 ते 20 )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा सर्वांची वाटाघाटीची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करणेत येईल ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| ७ | मे. विराज प्रविण नाणेकर | 46/26/2020-21 | मन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मुंजोबा वसाहत, माने कॉलनी, हनुमान सोसायटी, कृष्णसुंदर कॉलनी, ज्ञानदीप कॉलनी चिंचवडेनगर भागातील रहिवाशी कॉलन्या येथे नवीन पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दुरूस्त करणे. | 09/06/2021 | स्था/नि/२-ब/930/2021 | 05/07/2021 | 22,26,191 | 21,91,841 | 3,088 | 34,350 | 13.00 % कमी | 19,44,340 |
| ८ | मे. भालेराव कंन्स्ट्रक्शन | 46/27/2020-21 | मन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ जय गणेश कॉलनी, मोरया कॉलनी, वामनभाऊ कॉलनी चिंचवडेनगर भागातील रहिवाशी कॉलन्या येथे फुटपाथ व पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दुरूस्त करणे. | 2705/2021 | स्था/नि/२-ब/922/2021 | 18/06/2021 | 22,26,652 | 21,92,302 | 3,088 | 34,350 | 35.85 % कमी | 14,43,800 |
| ९ | मे. कुणाल तात्यासाहेब गायकवाड | 46/29/2020-21 | मन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मधील शिवनगरी भागात स्थापत्य विषयक कामे करणे. | 31/05/2021 | स्था/नि/२-ब/923/2021 | 18/06/2021 | 22,24,788 | 21,90,438 | 2,800 | 34,350 | 24.25 % कमी | 16,96,407 |
| १० | मे. ओंकार दिपक धवन | 46/32/2020-21 | मन २०२० -२१ करिता प्रभाग क्र.१७ मधील दळवीनगर बिजलीनगर भागात स्थापत्य विषयक कामे करणे. | 27/04/2021 | स्था/नि/२-ब/902/2021 | 11/06/2021 | 22,21,333 | 21,86,983 | 2,800 | 34,350 | 15.50 % कमी | 18,85,151 |
| ११ | मे. भालेराव कंन्स्ट्रक्शन | 46/33/2020-21 | मन २०२०-२१ करिता प्रभाग क्र. २२ काळेवाडी मधील ज्योतीबानगर व इतर ठिकाणचे पावसाळी पाण्याच्या नलीकांची दुरूस्ती करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | 31/03/2021 | स्था/नि/२-ब/919/2021 | 18/06/2021 | 24,97,242 | 24,62,892 | 5,910 | 34,350 | 15.00 % कमी | 21,33,718 |
| १२ | मे. एच. सी. कटारीया | 46/37/2020-21 | मन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.२२ परिसरामध्ये विविध कंपन्या/ मनपा मार्फत खोदण्यात आलेले चर डांबरीकरणाने दुरूस्ती करणे. | 09/06/2021 | स्था/नि/२-ब/931/2021 | 05/07/2021 | 24,96,652 | 23,89,352 | 14,657 | 1,07,300 | 30.60 % कमी | 17,80,167 |
| १३ | मे. जाधव कंन्स्ट्रक्शन कंपनी | 46/44/2020-21 | मन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.२२ मधील विजयनगर भागात स्थापत्य विषयक कामे करणे. | 31/05/2021 | स्था/नि/२-ब/943/2021 | 20/07/2021 | 24,78,028 | 24,43,678 | 5,405 | 34,350 | 12.00 % कमी | 21,90,192 |
| १४ | मे. शिंदे कंन्स्ट्रक्शन | 46/45/2020-21 | मन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.२२ मधील नढेनगर, राजवाडेनगर भागात स्थापत्य विषयक कामे करणे. | 15/04/2021 | स्था/नि/२-ब/905/2021 | 15/06/2021 | 24,78,021 | 24,43,671 | 5,405 | 34,350 | 30.22 % कमी | 17,44,949 |

Scanned with CamScanner

प्रपत्र अ ( 1 ते 20 )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा कर्वाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करण्यात येईल.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १५ | मे. परमानंद ए क्रिपलानी | 63/3/2020-21 | सन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१७ मध्ये आवश्यकते नुसार खडी मुरूमाचे रस्ते करणे. | 01/07/2021 | स्था/नि/२-ब/951/2021 | 04/08/2021 | 24,69,154 | 23,98,454 | 14,615 | 70,700 | 31.31 % कमी | 17,32,813 |
| १६ | मे.एस.के. भोसले कॉन्ट्रक्टर | 63/4/2020-21 | प्रभाग क्र १८ मधील चिंचवड गावठाण परिसर पावसाळी पाण्याच्या नलीकांची डागडुजी करणे व साफसफाई करणे. | 18/05/2021 | स्था/नि/२-ब/898/2021 | 11/06/2021 | 24,69,845 | 24,35,495 | 10,122 | 34,350 | 35.84 % कमी | 16,07,086 |
| १७ | मे.एस.के. भोसले कॉन्ट्रक्टर | 63/5/2020-21 | प्रभाग क्र १८ मधील भिमनगर, लोंढेनगर परिसर पावसाळी पाण्याच्या नलीकांची डागडुजी करणे व साफसफाई करणे. | 16/05/2021 | स्था/नि/२-ब/926/2021 | 23/06/2021 | 24,70,212 | 24,35,862 | 9,401 | 34,350 | 35.84 % कमी | 16,06,600 |
| १८ | मे. जाधव कंन्स्ट्रक्शन कंपनी | 63/07/2020-21 | केशवनगर शाळे पासुन प्रभात कॉलनी पर्यंतचे परिसरातील स्थापत्य विषयक कामे करणे. | 31/05/2021 | स्था/नि/२-ब/906/2021 | 15/06/2021 | 24,75,240 | 24,40,890 | 5,412 | 34,350 | 36.19 % कमी | 15,97,294 |
| १९ | मे. आर.जी. मंगलवेढेकर | 74/4/2020-21 | प्रभाग क्र १८ मधील स्थापत्य विषयक दुरूस्तीची कामे करणे. | 24/05/2021 | स्था/नि/२-ब/929/2021 | 24/06/2021 | 24,73,252 | 24,43,252 | 8,052 | 30,000 | 29.99 % कमी | 17,48,573 |
| २० | मे.एस.के. भोसले कॉन्ट्रक्टर | 63/8/2020-21 | प्रभाग क्र १८ मधील तानाजीनगर, केशवनगर परिसर पावसाळी पाण्याच्या नलीकांची डागडुजी करणे व साफसफाई करणे | 18/05/2021 | स्था/नि/२-ब/931/2021 | 05/07/2021 | 24,75,497 | 24,41,147 | 5,910 | 34,350 | 35.84 % कमी | 16,06,500 |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८